**पुणे विद्यापीठ**
**गणेशखिंड, पुणे–४११००७**

संदर्भ:– एक्स टी/बी.कॉम./ ३४ दिनांक:– १०/०३/२०१२

प्रति,

मा.प्राचार्य,

सर्व संबंधित संलग्न वाणिज्य महाविद्यालये,

**विषय:–** एप्रिल/मे २०१२ मध्ये होणा–या एस. वाय. बी. कॉम. /टी. वाय. बी. कॉम. परीक्षेच्या प्रवेश पत्रकाबाबत....

महोदय/महोदया,

एप्रिल/मे २०१२ मध्ये होणा–या एस. वाय. बी. कॉम. /टी. वाय. बी. कॉम परीक्षेसाठी आपल्या महाविद्यालयामार्फत जे विद्यार्थी बसलेले आहेत त्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा प्रवेशपत्रे पाठविण्याची व्यवस्था खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

१.नाशिक जिल्हयातील सर्व महाविद्यालयांचे वरील साहित्य विद्यापीठाच्या नाशिक येथील उपकेंद्रावर पाठवित आहोत.(विद्यापीठ विभागीय कार्यालय, नाशिक पोलिस आयुक्त कार्यालयासमोर एच.डी.एफ. सी.हाऊस जवळ, महानगरपालिका मार्केट इमारत, तिसरा मजला नाशिक–२) आपल्या महाविद्यालयाचा प्रतिनिधी दि. १२/०३/२०१२ रोजी दुपारी १.०० ते ४.०० या वेळेत पाठवून सदरचे साहित्य या उपकेंद्रावरून घेवून जाण्याची व्यवस्था करावी.

२. अहमदनगर जिल्हयातील सर्व महाविद्यालयांचे वरील साहित्य विद्यापीठाच्या अहमदनगर येथील उपकेंद्रावर पाठवीत आहोत. (विद्यापीठ विभागीय कार्यालय, न्यू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अहमदनगर) आपल्या महाविद्यालयाचा प्रतिनिधी दि. १२/०३/२०१२रोजी दुपारी १.०० ते ४.०० या वेळेत पाठवून सदरचे साहित्य या उपकेंद्रावरून घेवून जाण्याची व्यवस्था करावी.

३. पुणे शहरातील व पुणे जिल्हयातील सर्व महाविद्यालयांनी वरील साहित्य विद्यापीठाच्या परीक्षा विभागाच्या बी. कॉम. कक्षातून दिनांक १२/०३/२०१२ रोजी सकाळी ११.०० ते ४.००.या वेळेत महाविद्यालयाचा प्रतिनिधी पाठवून सदरचे साहित्य घेवून जाण्याची व्यवस्था करावी.

कळावे.

आपला विश्वासू,

उपकुलसचिव
(छाननी व तालिनीकरण)

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी:–

१. केंद्र प्रमुख, विद्यापीठ उपकेंद्रे, नाशिक व अहमदगनर.
सदरचे साहित्य संबंधित महाविद्यालयांना वेळेत उपलब्ध करून द्यावे.

२. मा. गृहव्यवस्थापक (गृहव्यवस्थापन विभाग)
प्रत्येक उपकेंद्रासाठी दि. १२/०३/२०१२ रोजी सकाळी ७.०० वा. दोन स्वतंत्र वाहने उपलब्ध करण्याची व्यवस्था करावी.